# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नरडाणा (ता.सिंदखेडा, जि.धुळे) येथील ग्रामीण रूग्णालयाचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(१) ८१३ (२२-१२-२०१४). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरडाणा (ता.सिंदखेडा, जि.धुळे) येथे गेल्या अनेक वर्षापासून ग्रामीण रूग्णालय मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रूग्णालयासाठी जागेची उपलब्धता असतांना देखील ग्रामीण रूग्णालयाची इमारत बांधकाम तसेच ग्रामीण रूग्णालयातंर्गत येणारे साहित्य व कर्मचा-यांची नियुक्ती अद्याप याठिकाणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

दि. १७/१/२०१३ च्या शासन निर्णया अन्वये मंजूर करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

बृहत आराखड्यासाठी येणाऱ्या एकूण खर्चाचे नियोजन आणि पदांची निर्मिती गेल्या ५ वर्षात टप्याटप्याने करण्याबाबतचे नियोजन आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, धुळे यांचेकडे प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा नावावर करणेकामी जिल्हा शुल्य चिकित्सक, धुळे यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे. तसेच जिल्हाधिकारी धुळे यांचेकडे पर्यायी जागेची मागणी केलौ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे, नंदुरबार आणि जळगांव या तिन्ही जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून धुळे शहरात सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल उभारण्याबाबत

**(२) ८२२ (२३-१२-२०१४). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरालगत मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग व सुरत-अमरावती हे दोन्ही राष्ट्रीय महामार्ग जातात, तसेच धुळे, नंदुरबार आणि जळगांव या तिन्ही जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून धुळे शहरात सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल उभारण्यात यावे असा प्रस्ताव शासनाच्या गेल्या अनेक वर्षापासून विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासन तातडीने सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल उभारण्याबाबत काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही. असा प्रस्ताव विचाराधीन नाही. तथापि दिनांक १७/१/२०१३ च्या शासन निर्णया अन्वये धुळे येथील जिल्हा मुख्यालयी १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय व १०० खाटांचे स्त्री रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर शहरातील गांधीबाग येथील डागा स्मृती शासकीय रुग्णालयाच्या बांधकामाबाबत

**(३) १०१५ (२२-१२-२०१४). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील गांधीबाग येथील डागा स्मृती शासकीय रुग्णालयाला शासन पुरक परिपत्रक क्र संकीर्ण /प्र.क्र.४०२ आरोग्य/३ अन्वये ५०० खाटांचे नवीन रुग्णालय बांधकामास मंजूरी प्रदान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाचे बांधकाम अद्यापही सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार सदर ५०० खाटांचे रुग्णालयाचे बांधकाम तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) दिनांक ९ जून, २०१४ च्या शासन निर्णया अन्वये नागपूर येथील डागा स्मृती रुग्णालयांच्या ३०० खाटांवरुन ५०० खाटांच्या स्त्री रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय.
(४) नागपूर येथील डागा स्मृती रुग्णालयाच्या वाढीव २०० खाटांच्या रुग्णालयाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांचेकडून प्राप्त करुन घेण्याबाबत वैद्यकिय अधिक्षक डागा स्मृती रुग्णालय नागपूर यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भातकुली ग्रामीण रुग्णालय व बडनेरा ट्रामा केअर हॉस्पीटल येथील डॉक्टर व कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४) ११३२ (१५-०१-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भातकुली ग्रामीण रुग्णालय व बडनेरा ट्रामा केअर हॉस्पीटल ह्या दोन्ही इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णांच्या सुविधांसाठी दोन्ही रुग्णालये केव्हा पर्यंत सुरू करण्यात येणार आहेत,
(३) तसेच उपरोक्त हॉस्पीटल मध्ये डॉक्टर व कर्मचारी पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) बडनेरा ट्रामा केअर युनिटची काही पदे भरण्यात आल्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात रुग्णसेवा सुरु करण्यात आली आहे. तसेच भातकुली रुग्णालयातील सर्व पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण होताच रुग्णालय कार्यान्वित करण्यात येईल.
(३) वैद्यकिय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याकरिता २०१३ मध्ये स्वतंत्र निवड मंडळातर्फे १८८१ पदांची जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार २०१४ मध्ये एकूण ६६४ वैद्यकीय अधिकारी रुजू झाले आहेत. उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
गट क व गट ड मधील रिक्त पदे भरण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही सुरु करण्यात आली असून सर्व रिक्त पदे लवकरच भरण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गणोरी (ता.भातकुली, जि.अमरावती) येथील मंजूर असलेला प्राथमिक आरोग्य केंद्राना जागा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(५) ११४२ (२३-१२-२०१४). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गणोरी (ता.भातकुली, जि.अमरावती) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झाले असून ते गणोरी येथे कार्यान्वित झाले नाही, गणोरी येथे जागा उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबत शासनाने जागा उपलब्ध करून देण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

गणोरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झालेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जनेरिक औषधांच्या वापरामध्ये वाढ करणेबाबत**

**(६) १२८९ (२२-१२-२०१४). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये प्रायोगिक तत्वावर जनऔषधी केंद्र (जनेरिक औषध केंद्र) सुरु करण्याबाबत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने त्यासाठी आवश्यक अनुदानाच्या उपलब्धतेस्तव राज्य शासनाने केंद्र शासनास सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाबाबत केंद्र शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, प्रस्तावास केंद्र शासनाने अद्यापही मान्यता दिली नसल्यास, याबाबत कोणत्या स्वरुपात पाठपुरावा करण्यात येत आहे व या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, नवीन औषध खरेदी धोरणानुसार राज्यातील आरोग्य संस्थांना जेनेरिक औषध करणेबाबतच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) राज्यामध्ये प्रायोगिक तत्वावर जनऔषधी केंद्र (जनेरिक औषध केंद्र) सुरु करण्याबाबत आवश्यक अनुदान उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणताही प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनास सादर केलेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील बंद असलेल्या सीटी स्कॅन सुविधेबाबत**

**(७) १५६२ (२३-१२-२०१४). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात उपलब्ध असलेली सीटी स्कॅन सुविधा अनेक वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही सुविधा सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे नवीन सीटी स्कॅन मशीन खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच मशीन बंद असली तरी गरीब रुग्णाचे सी.टी.स्कॅन डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय अमरावती व मातोश्री डायग्नोस्टीक सेंटर अमरावती यांचेकडून करुन देण्यात येत असल्यामुळे रुग्णांची गैरसोय निर्माण होत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(८) १५६५ (२२-१२-२०१४). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील जिल्हा स्त्री रुग्णालयांचे विस्तारीकरणाच्या बांधकामास शासन निर्णय क्र. प्रशाया/२०१३/प्र.क्र./१६७/आरोग्य-३ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पात किती निधीची तरतुद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, या रुग्णालयाच्या कामांना कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, या रुग्णालयाच्या प्रत्यक्ष बांधकामास केव्हा सुरुवात होणार आहे,

(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

दि. १२/४/२०१३ च्या शासन निर्णया अन्वये अमरावती जिल्ह्यातील जिल्हा स्त्री रुग्णालयाचे विस्तारीकरणाच्या बांधकामास मान्यता प्राप्त करण्यात आली आहे.

(२) रु. १५४७.४८ लक्ष सदर निधी ठेव निधी अंतर्गत प्राप्त आहे.

(३) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सेवा अंतर्गत सर्व कामे निविदा स्तरावर असून कार्यारंभ आदेश देण्यात आलेला नाही.

(४) निविदा प्रक्रीया पूर्ण होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सर्व जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची अपुऱ्या सोयीसुविधा आणि कर्मचारी वर्ग नसल्यामुळे झालेली दुरवस्था**

**(९) २०११ (२९-१२-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे अपुऱ्या सोयीसुविधा आणि कर्मचारी वर्ग नसल्यामुळे बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती प्राथमिक आरोग्य केंद्रातील दयनीय अवस्था सुधारण्याबाबत आवश्यक त्या सोयीसुविधा व कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

राज्यात कार्यरत असलेली एकूण १८११ प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत ग्रामीण भागातील जनतेला २४ तास वैद्यकीय आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फर्दापूर (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथे शासनाच्या "आपत्तकालीन वैद्यकीय सेवा आपल्यादारी" या योजनेतील रुग्णवाहिकेबाबत**

**(१०) २०९६ (२२-१२-२०१४). श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फर्दापूर (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथे शासनाच्या "आपत्तकालीन वैद्यकीय सेवा आपल्यादारी" या योजनेअंतर्गत रुग्णवाहिकेचे कंत्राट बी.व्ही.जी. या कंपनीला दिल्यानंतर डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी रुग्णांकडून अडवणूक करुन नियमबाहयपणे रक्कमेची मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) आपत्कालीन वैद्यकीय सेवा योजनेच सेवापुरवठादार डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी रुग्णांकडून अडवणूक करुन नियमबाहयपणे रक्कमेची मागणी केली असल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच अशा प्रकारची कोणतीही तक्रार शासनाकडे अथवा १०८ या क्रमांकावर प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव येथील महिला रुग्णालयाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत**

**(११) २३१३ (२३-१२-२०१४). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव येथील महिला रुग्णालयास माहे जानेवारी, २०१३ मध्ये मंजूरी देवून या रुग्णालयासाठी आठ कोटी रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील रुग्णालयाचे अद्यापही जागे अभावी काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत कोणत्या उपायोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) दिनांक १७ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयाअन्वये जळगाव येथील १०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालय स्थापन करण्यात मान्यता दिलेली आहे. तथापि, जुलै, २०१३ मध्ये रुग्णालयासाठी आठ कोटींचा निधी वर्ग करण्यात आलेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) महिला रुग्णालयांकरिता जागा प्राप्त झालेली असून जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव यांनी १०० खाटांच्या महिला रुग्णालयाच्या बांधकामाची अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट शहरातील नागपूर हैद्राबाद महामार्गावरील उपजिल्हा रुग्णालयामध्ये ट्रामा केअर युनिटमध्ये अत्यावश्यक सुविधा नसल्याबाबत**

**(१२) २६९८ (१५-०१-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट शहरातील नागपूर हैद्राबाद महामार्गावरील उपजिल्हा रुग्णालयामध्ये ट्रामा केअर युनिट असून व तेथे अत्यावश्यक सुविधा नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उप जिल्हा रुग्णालयास ट्रामा केअर युनिट व अत्यावश्यक सोयी व औषधे उपलब्ध करण्यास्तव शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) अशंतः खरे आहे.

ट्रामा केअर युनिटसाठी आवश्यक साधन सामुग्री व उपकरणे पुरविण्यत आली आहेत. तसेच सर्व रुग्णांना उपजिल्हा रुग्णालय, हिंगणघाट यांचे मार्फत औषधांचा पुरवठा व आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. तसेच आवश्यक तज्ञसेवा एनआरएचएम अंतर्गत त्या त्यावेळी उपलब्ध करुन देण्यात येतात.

(२) उपजिल्हा रुग्णालय हिंगणघाट येथील ट्रामा केअर युनिटचे बांधकाम पूर्ण झाले असून इमारतींच्या बांधकामाच्या त्रुटी अभावी ट्रामा केअर युनिट सुरु करण्यास विलंब झाला आहे. त्रुटी पूर्ण करुन देण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग वर्धा यांचेकडून कार्यवाही सुरु आहे. तसेच आवश्यक सामुग्री व औषधे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील मालेगाव व रिसोड येथील ग्रामीण रूग्णालयातील वैदयकिय उपकरणे बंद असल्याबाबत**

**(१३) ४२७९ (२३-१२-२०१४). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील ग्रामीण रूग्णालय मालेगाव व रिसोड येथील वैद्यकिय उपकरणे गत ५ वर्षापासुन बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील ऑपरेशन थिएटर, क्ष-किरण व ई.सी.जी. ही अत्यावश्यक उपकरणे बंद असल्यामुळे रूग्णसेवेवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय मालेगाव व रिसोड येथील वैद्यकीय उपकरणे चालू स्थितीत आहे.

(२) ग्रामीण रुग्णालय रिसोड येथील क्ष-किरण मशीन बंद आहे. सदर मशीन दुरुस्त होत नसल्यामुळे मशीन निर्लेखित करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, वाशिम स्तरावर सुरु आहे. परंतु ग्रामीण रुग्णालय मालेगाव येथील क्ष-किरण मशीन चालु स्थितीत आहे.

तसेच दोन्ही ग्रामीण रुग्णालयात ऑपरेशन थिएटर, क्ष-किरण व ई.सी.जी ही अत्यावश्यक उपकरणे चालू स्थितीत आहेत. त्यामुळे रुग्णसेवेवर कुठलाही परिणाम होत नसून रुग्णसेवा सुरळीतपणे चालू आहे. तसेच आवश्यक असल्यास रुग्णास जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथे पुढील अत्यावश्यक सेवेसाठी संदर्भीत केले जाते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी तालुक्यात १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकामाच्या प्रस्तावाबाबत**

**(१४) ५४७१ (०६-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड. यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावीत (इगतपुरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी तालुक्यात १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी १० कोटी २५ लाख रुपये किंमतीचे अंदाजपत्रक आणि नकाशासह प्रस्ताव कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग चंद्रपूर ह्यांनी तयार करुन जिल्हा शल्य चिकित्सालय, चंद्रपूर यांच्याकडे पाठविला असता त्यांनी मंजुरीसाठी सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये राज्यस्तर, मुंबई यांच्याकडे जा.क्र.सारुचं/ग्रारुब्र/नकाशे मंजुर/१६२९५-९९, दिनांक ३ जुलै, २०१४ रोजी पाठविलेला होता, त्या अनुषंगाने संचालक आरोग्य विभाग, मुंबई यांनी पत्र क्र.संआसे/राज्यस्तर/ब्रम्हपूरी/श्रेणीवर्धन/बांधकाम/टे.६/कक्ष-३२१४, दिनांक ३ सप्टेंबर, २०१४ नुसार अंतीम मंजूरीसाठी आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सदर प्रस्ताव पाठविला असता त्यास अद्यापही मंजुरी मिळालेली नाही त्यामुळे लोकप्रतिनिधींनी, मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य यांना दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास निधीसहीत मंजूरी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रस्तावाची किंमत रु ५ कोटी पेक्षा जास्त असल्याने त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची मान्यता घेऊन सचिव समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातील सुधारित आकृती बंधास मान्यता देण्याचा प्रस्ताव**

**(१५) ५९९१ (०७-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातील सुधारित आकृती बंधास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असल्यामुळे येथील ३६७ पैकी सुमारे १०० पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर रुग्णालयातील अतिविशेषोपचार तज्ञ व तंत्रज्ञांना प्रोत्साहनपर विशेष वेतनवाढी मंजुर करण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर रुग्णालयासाठी आकृतीबंधाव्यतिरिक्त अतिरिक्त स्वरुपात वैद्यकीय व शुश्रूषा संवर्गातील परिचारिकांची पदे नव्याने निर्माण करुन सदर पदे भरणेबाबत शासनस्तरावर प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) ते (३) बाबत शासनामार्फत कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) खरे नाही.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक येथे शासनाने दिनांक १५/११/२००६ रोजी आकृतीबंधास मान्यता देवून ३६७ पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. पैकी २८७ पदे भरलेली असून ८० पदे रिक्त आहेत.
(२), (३) व (४) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**मौजे सुजातपूर गट ग्राम पंचायत अंतर्गत आमसरी, (ता.खामगांव जि.बुलढाणा) येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करणेबाबत**

**(१६) ८४९९ (०७-०४-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सुजातपूर गट ग्राम पंचायत अंतर्गत आमसरी (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करणेबाबत सरपंच ग.पं.यांनी मुख्य कार्यपालन अधिकारी, जि.प.बुलढाणा यांचेकडे पत्राद्वारे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे आमसरी येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्र झाल्यास १५ खेड्यातील नागरीकांना प्राथमिक आरोग्याच्या सोयी - सुविधा जवळ उपलब्ध होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मौजे आमसरी येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकामास शासन मंजुरात देवून निधी उपलब्ध करुन देणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडे सरंपच यांनी आमसरी येथे प्रा.आ.केंद्र सुरु करण्याबाबतचा ठराव सादर केला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महिलांना आरोग्य सेवेचा लाभ देणेसाठी प्रत्येक जिल्हयात स्वतंत्र महिला आणि बाल रुग्णालयांना मंजुरी देणेबाबत**

**(१७) ८५९४ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिलांना आरोग्य सेवेचा लाभ देणेसाठी तत्कालीन आघाडी सरकारने प्रत्येक जिल्हयात स्वतंत्र महिला आणि बाल रुग्णालयांना मंजुरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात केवळ आठ जिल्हयात महिला रुग्णालय कार्यरत असून, १४ स्वतंत्र १०० खाटांच्या महिला रुग्णालयांना मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तातडीने महिला रुग्णालय सुरु करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा केली आहे,

(५) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) मंजूर झालेल्या स्त्री रुग्णालयाच्या मुख्य इमारत व निवासी इमारती बांधकामासाठी पुरेशी जागा उपलब्ध करुन बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त होताच प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा नान्होरी (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबत**

**(१८) ८६४३ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा नान्होरी (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना एक लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप या संदर्भात मंजूरी दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासन पत्र दि.६/५/२०१५ अन्वये संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील ५० खाटांच्या रुग्णालयाचे बांधकाम मंजूरीबाबत**

**(१९) ८६५१ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील सन २०१२-१३ मध्ये ग्रामीण रुग्णालय ५० खाटांच्या रुग्णालयाचे बांधकाम मंजूरीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना एक लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप या संदर्भात मंजूरी दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याबाबतचा अंदाज व आराखड्याचा प्रस्ताव शासन स्तरावर अप्राप्त आहे. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयातील सोयीसुविधा व रिक्त पदांबाबत**

**(२०) ८८३० (०७-०४-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील सामान्य रूग्णालय अंतर्गत ग्रामीण भागातील नागरिकांचा उपचारासाठी सात ठिकाणी ग्रामीण रूग्णालयांची स्थापना करण्यात आली परंतु याठिकाणी मुलभूत सोयी-सुविधांचा अभाव व अधिकारी, कर्मचाऱ्यांची ५३ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण परिसरातील ८० हजार गरीब व सामान्य परिसरातील नागरिक या रूग्णालयावर आश्रित आहेत व मोठ्या आशेने आलेल्या रूग्णांची पराकाष्टा होत असल्यामुळे शेवटी त्यांना खाजगी डॉक्टरांची सेवा घेतल्याशिवाय मार्ग नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांना सोयी-सुविधांचा पुरविण्याबाबत तसेच सदर रूग्णालयात रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

भंडारा जिल्ह्यात सात ग्रामीण रुग्णालये असून या ठिकाणी मुलभूत सोयी सुविधांचा अभाव नाही. या सर्व संस्थांमध्ये एकूण सर्व संवर्गाची ५६ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासन तसेच संचालक स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाचा जवळपास १२ कोटींचा निधी शासनास परत करण्यात आल्याबाबत**

**(२१) ९२११ (०७-०४-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाचा १२ कोटींचा निधी शासनास परत करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या निधीचा विनियोग न होण्यामागील नेमकी कारणे काय,

(३) असल्यास, निधीचा विनियोग न केल्या प्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कारवाई केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. रु. २.६४ कोटी इतका निधी शासनास परत करण्यात आला आहे.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांच्या बांधकामासाठी वेळेत जागा न मिळाल्याने निविदा प्रक्रिया लांबल्यामुळे निधी परत करण्यात आला.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील गडचिरोली सारख्या अतिदुर्गम भागात हॅमरेडीओ उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२२) ९८३५ (०७-०४-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिदुर्गम भागामध्ये मोबाईलला रेंज येत नसल्यामुळे डॉक्टर व रुग्णांना सरकारी आरोग्य केंद्राशी संपर्क साधता येत नसल्याने या भागात रुग्ण दगावतअसल्याने अशा ठिकाणी गिर्यारोहक वापरत असलेली हॅमरेडीओ सुविधा उपलब्ध करुन देण्याचा शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जाने २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिदुर्गम भागात हॅमरेडीओ क्लब स्थापण्यासाठी केंद्र शासनाकडून परवानगी मिळण्याबाबत राज्य शासनाने पाठपुरावा केला आहे काय,
(३) असल्यास, हॅमरेडिओ क्लब स्थापनाबाबत राज्यशासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१), (२) व (३) हॅमरेडीओ सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत उपयोगितेचा अभ्यास करण्यात येत आहे,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आरोग्य विभागाचा मोफत रूग्णवाहिका हा अत्यंत महत्वकांक्षी प्रकल्प बी.व्ही.जी. या खाजगी कंपनीला देण्यात आल्याबाबत**

**(२३) १००८५ (०७-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आरोग्य विभागाचा मोफत रूग्णवाहिका हा अत्यंत महत्वकांक्षी प्रकल्प बी.व्ही.जी. या खाजगी कंपनीला देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) सदर कंपनीला कंत्राट देत असताना या कंपनीकडे उपलब्ध असणाऱ्या एकूण रूग्णवाहिकांची तपासणी आरोग्य विभागाने केली होती काय,
(३) सदरहू बी.व्ही.जी.कंपनीला दिलेल्या कंत्राट रकमेमध्ये पहिला, दुसरा हप्ता न देता तिसऱ्या हप्त्यांची संपूर्ण रक्कम बी.व्ही.जी. कंपनीला दिला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या कंपनीने जोडलेल्या कागदपत्रांमध्ये अनेक त्रुटी व खोटे कागदपत्र जोडले आहेत याबाबत शासन या कंपनीच्या व कागदपत्रांची तपासणी करून योग्य कारवाई करेल काय ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) कंपनीला कंत्राट देतांना सदर कंपनीने निविदेतील पात्रता अटीनुसार किमान १०० रुग्णवाहिका चालवित असल्याचे प्रमाणपत्र वाहनाच्या रजिस्टर नंबरसहित सादर केले आहे.
(३) मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांना अनावर्ती खर्च ६ हप्त्यामध्ये वाहन उपलब्ध करुन दिल्यानुसार अदा करण्यात आला तर आवर्ती खर्च दरमहा अदा करण्यात येतो.
(४) सदर कंपनीने खोटी कागदपत्रे जोडल्याचे आढळून आलेले नाही.

---

**वाशिम जिल्हयातील रिसोड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र**
**लोप (ता. रिसोड) येथे स्थलांतरीत केल्याबाबत**

**(२४) ११५१९ (०६-०४-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील रिसोड शहराच्या मध्यभागी पोलीस स्टेशनच्या बाजूला नागरिकांच्या आरोग्य सुविधेसाठी ३ एकर परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९७ च्या दरम्यान रिसोड येथे ग्रामीण रुग्णालय सुरु झाल्यामुळे रिसोड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र लोप (ता.रिसोड) येथे स्थलांतरण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरीत झाल्यामुळे जिल्हा परिषद, वाशिम कडून करोडो रुपयांच्या या वास्तुकडे दुर्लक्ष झाल्याचे दिनांक १३ जुलै, २०१३ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा परिषद, वाशिम कडून या वास्तु देखभाल वा उपयोगासाठी काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय याबाबत शासनाची स्पष्ट भुमिका काय ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) जुन्या इमारतीच्या देखभाल दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध नसल्याने दुरुस्ती करण्यात आलेली नाही.

---

**मुंबई, ठाणे, अकोला विभागात सार्वजनिक आरोग्य विभागाची रुग्णालये तसेच राज्य कामगार विमा विभागाच्या रुग्णालयात बाजार भावापेक्षा जास्त दराने**
**केलेल्या खरेदीची चौकशी करण्याबाबत**

**(२५) १२७०३ (०८-०४-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, अकोला विभागात सार्वजनिक आरोग्य विभागाची रुग्णालये तसेच राज्य कामगार विभागाची रुग्णालये तसेच राज्य कामगार विमा विभागाच्या रुग्णालयात बाजार भावापेक्षा जास्त दराने तांदूळ, गहू, साखर, गोडतेल, मसाले तसेच अंडी, कोंबड्या आणि केळी खरेदीची सखोल चौकशी करुन संबंधितांवर आर्थिक गुन्हे विभागाकडे गुन्हा दाखल करण्यात येईल व या संबंधी चौकशीचे आदेश मा.मंत्र्यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही वा कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) याबाबत संपूर्ण चौकशी करण्याचे आदेश आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीस दिनांक १०/०७/२०१५ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.
(२) व (३) चौकशी पूर्ण झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**मारेगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वास्तु व बांधकामाकरिता तीन कोटींचा निधी पुरविण्याबाबत**

**(२६) १३७२३ (०८-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील वेगांव येथे सामान्य जनतेपर्यंत आरोग्याच्या सुविधा पोहोचाव्या या हेतूने शासनाने पाच वर्षापुर्वी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वास्तुसाठी निधी मंजुर केला असून विविध अडचणीमुळे या वास्तुचे बांधकाम पुर्ण न झाल्याने या भागातील आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेगांव परिसरातील आरोग्य सुविधांचा बिकट प्रश्न लक्षात घेता वेगाव येथे तब्बल ३ कोटी रुपये खर्च करुन प्राथमिक आरोग्य केंद्राची वास्तू बांधण्याचा निर्णय घेतला तथापी प्रत्यक्षात वास्तूचे बांधकाम हाती घेताच अनेक अडचणी निर्माण झाल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बांधकाम साहित्य नेण्यास रस्ता नसल्याचे कारण सांगून अनेक दिवस हे काम रखडले व सुरु झाल्यानंतर बांधकाम कंत्राटदाराने काम बंद केले या संदर्भात सरपंच व ग्रामस्थांनी जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता यांना भेटी व निवेदन देऊन अद्यापपर्यंत कामाला सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली व येत आहे व कसे ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१), (२) व (३)
हे अंशत: खरे आहे,
प्राथमिक आरोग्य केंद्र वेगाव च्या नवीन इमारतीचे बांधकामाच्या जागेवर जाणाऱ्या पोचमार्गावर अतिक्रमण असल्याने बांधकाम साहित्य वाहतुक करणे शक्य नसल्याने इमारतीचे बांधकाम बंद पडले आहे. परंतु आरोग्य सेवेचे काम सुरु आहे.
(४) महसूल विभागामार्फत अतिक्रमण निष्कासन कार्यवाही सुरु असून याबाबत सुधारीत अंदाजपत्रकास तांत्रीक मान्यता प्राप्त होताच अपूर्ण काम पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात येणा-या रुग्णांना उपलब्ध सर्व सेवा पुरविण्याबाबत**

**(२७) १४२७२ (०८-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना उपलब्ध सर्व सेवा पुरविणे हे शासनाचे धोरण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रुग्णालयात प्रसुती करण्याची एक्स-रे काढण्याची व लहान-मोठ्या शस्त्रक्रिया करण्याची सोय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच येथील वैद्यकीय अधिक्षक वयाच्या प्रमाणपत्राचे पैसे घेऊन पावती देत नाही, हे खरे आहे काय,

(४) तसेच कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरद्वारे करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(५) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत रुग्णालयात सर्जन व इतर डॉक्टरांची सोय उपलब्ध करण्यात आलेली होती पण त्या काळात कुठल्याही प्रकारची शस्त्रक्रिया करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(६) याबाबत शासनाने कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

एक्स रे मशीन नादुरुस्त असल्यामुळे निर्लेखनास प्रस्तावित केलेली आहे. प्रसुती व लहान-मोठया शस्त्रक्रिया करण्याची सोय आहे.

(३) नाही.

(४) होय.

(५) नाही. या रुग्णालयात सन २०१४-१५ मध्ये १८९ लहान शस्त्रक्रिया तर ११३ मोठया शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारोळा (जि. जळगांव) येथील नॅशनल हायवे नं.६ येथील ट्रामा केअर इमारतीत अद्याप औषधोपचार सुविधा सुरु करण्यात न आल्याबाबत**

**(२८) १४६६६ (०८-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) येथील नॅशनल हायवे नं ६ येथे मोठ्या प्रमाणात अपघात होत असून अपघातातील जखमींना तातडीने उपचार मिळवेत म्हणून ५ वर्षापूर्वी ट्रामा केअरला मंजुरी घेऊन ६५ लाख खर्च करून इमारत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीत अद्याप औषधोपचार देण्याचे सुरू करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर इमारतीत औषधोपचार मिळावेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) नाही. पारोळा येथे ट्रामा केअर युनिट मंजुर नाही. बांधण्यात आलेली इमारत अतिदक्षता विभाग म्हणून बांधण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेवगाव-पाथर्डी (जि. अहमदनगर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील १३ पदे रिक्त असल्याबाबत**

**(२९) १४६७३ (०८-०४-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवगाव-पाथर्डी (जि. अहमदनगर) तालुक्यातील बोधेगाव ग्रामीण रुग्णालयात अपु-या कर्मचा-यांमुळे ग्रामीण रुग्णालयातील रुग्णसेवा कोलमडली असून गेल्या अनेक महिन्यांपासून एकच वैद्यकीय अधिकारी कार्यरत असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात तीन वैद्यकीय अधिकारी व एका अधिक्षकासह तब्बल १३ पदे रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयात तातडीने रिक्त पदे भरुन रुग्णांची गैरसोय दूर करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०१-२०१६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय , बोधेगाव येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण २५ पदे मंजूर असून ११ पदे भरलेली व १४ पदे रिक्त आहेत.

सदर रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिक्षक संवर्गाचे १ पद मंजूर असून सदर पद रिक्त आहे. या पदाचा कार्यभार ग्रामीण रुग्णालय, शेवगाव येथील वैद्यकीय अधिकारी गट-अ यांचेकडे देण्यात आलेला आहे. वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची ३ पदे मंजूर असून १ पदावर अस्थायी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत व २ पदे रिक्त आहेत. गट-क संवर्गाची ७ पदे व गट- ड संवर्गाची ३ पदे रिक्त आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.

(३) वैद्यकीय अधिक्षकांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून अर्जाची छाननी सुरु आहे. तसेच कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शाहूवाडी तालुक्यातील (जि. कोल्हापूर) प्राथमिक आरोग्य केंद्रामधील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदाबाबत

**(३०) १४७९६ (०८-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहूवाडी तालुक्यातील (जि. कोल्हापूर) प्राथमिक आरोग्य केंद्रामधील १६ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदापैकी केवळ ३ पदे भरली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे तालुक्यातील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किमान एका वैद्यकीय अधिका-याची नियुक्ती शासन तातडीने करणार आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (११-०१-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयातील शाहुवाडी तालुक्यात ८ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत. सदर ८ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अधिकाऱ्यांची प्रत्येकी दोन या प्रमाणे १६ पदे मंजूर पदांवर ५ स्थायी व ३ बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी पद रिक्त आहे, अशा ठिकाणी १५ दिवसांच्या रोटेशन पध्दतीने कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांना तात्पुरत्या नेमणूका देण्यात आल्या आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून अर्जाची छाननी सुरु आहे. तसेच कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

---

**बुटीबोरी व वाडी (जि.नागपूर) येथे शासनाकडून ग्रामीण रुग्णालयाच्या योजनेबाबत**

**(३१) १४८४७ (०८-०४-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुटीबोरी व वाडी (जि.नागपूर) येथे शासनाकडून ग्रामीण रुग्णालयाची योजना मंजूर झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाकरिता पाहणी करण्यात आलेल्या ३ एकर जागा मंजूरी प्राप्त करुन देण्याची तसेच सदरहू योजनेच्या कार्यवाही करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री यांच्याकडे दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन सदरहू योजना लवकरात लवकर करण्याकरिता शासन विचाराधीन आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय, जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडधामणा (जि.नागपूर) येथे उपलब्ध असलेल्या जागेवर आरोग्य केंद्र मंजुर करण्याची मागणी**

**(३२) १४८४८ (०८-०४-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडधामणा (जि.नागपूर) येथील असलेल्या प.ह.न.६ सर्वे १८५ आराजी ०.८१ हेक्टर आर या उपलब्ध असलेल्या जागेवर आरोग्य केंद्र मंजुर करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर आरोग्य केंद्र बांधण्याकरिता शासन विचारधीन आहे काय,

(३) नसल्यास, सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक १५/२/२०१४ रोजी झालेल्या आरोग्य समितीच्या सभेमध्ये उपकेंद्र नागलवाडी येथील उपकेंद्र वडधामणा येथे स्थलांतरीत करण्याबाबत चर्चा झाली असता मौजा नागलवाडी येथे

नवीन उपकेंद्राकरीता ग्रामपंचायत नागलवाडी यांनी जागा उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे स्थानांतरणाबाबतचा ठराव आरोग्य समितीमध्ये मंजुर झालेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वणी (जि. नाशिक) शहरात प्रामुख्याने ट्रामा केअर युनिट स्थापन करण्याच्या निर्णयाबाबत**

**(३३) १५३०८ (०९-०४-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि. नाशिक) शहरात प्रामुख्याने ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यास शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) वणी शहरात ट्रामा केअर युनिट स्थापन झाल्यास आपतग्रस्तास आवश्यक ती वैद्यकीय सुविधा पहिल्या तासात मिळाल्यास रुग्णाचे प्राण वाचू शकतात, हे खरे आहे काय, असल्यास याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे,
(३) असल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) नाही.
(२) व (३) राज्यातील महामार्गावर पर्यायाने ज्या ठिकाणी अपघातांची संख्या जास्त आहे, अशा ठिकाणी ट्रामा केअर युनिट स्थापन करण्याचे शासन धोरण आहे, तसेच अशा किमान ग्रामीण रुग्णालय अस्तित्वात असावे अशा पध्दतीने नवीन ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यात आली आहेत. या निकषांमध्ये वणी जि. नाशिक बसत नाही.

---

**वणी (जि. नाशिक) येथील ग्रामीण रूग्णालयाला शासनाच्या आदेशानुसार उपजिल्हा दर्जामध्ये वर्ग करण्याबाबत**

**(३४) १५३१५ (०९-०४-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि. नाशिक) येथील ग्रामीण रूग्णालयाला शासनाच्या आदेशानुसार उपजिल्हा दर्जामध्ये वर्ग करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रूग्णालयाच्या सोयी व सवलती कधी मिळणार यासाठी आर्थिक तरतूद केली आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बसमत (जि.हिंगोली) येथील शासकीय स्त्री रूग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३५) १५३२४ (०९-०४-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बसमत (जि.हिंगोली) येथील शासकीय स्त्री रूग्णालयात आवश्यक ती पदे न भरल्यामुळे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रिक्त पदांमुळे या रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांची हेळसांड होऊन त्यांना योग्य आरोग्य सेवा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रूग्णांना योग्य सेवा मिळण्यासाठी शासन सदर रिक्त पदे किती कालावधीत भरणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१२-०१-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

एकूण मंजूर ८२ पदांपैकी २५ पदे भरलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून आरोग्य सेवा पुरविण्यात येते.

(३) वर्ग ३ व वर्ग ४ ची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी गट अ (वर्ग १) च्या पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्याची कार्यवाही सुरु असून ही पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**गोंदिया जिल्हयातील देवरी येथील राष्ट्रीय महामार्ग ६ वर**
**ट्रामा केअर युनिट कार्यरत करण्याबाबत**

**(३६) १५६९१ (०९-०४-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील देवरी येथील राष्ट्रीय महामार्ग ६ वर ट्रामा केअर युनिट कार्यरत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रामा केअर युनिटची अति आवश्यकता असतांना ते बंद करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग ६ वर अपघाताची संख्या अधिक आहे, त्यामुळे आदिवासी जनता सोयींपासून वंचित होत आहे, त्याकरिता ट्रामा केअर युनिट पुन्हा सुरु करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा केव्हा सुरु होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) होय, सदर ट्रामा केअर युनिट आजही कार्यरत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) ट्रामा केअर युनिट कार्यान्वित असल्यामुळे पुन्हा सुरु करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाचोरा तालुक्यात (जि.जळगांव) खेडगांव (नदीचे) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व जारगांव, सारोळा व कोल्हे येथे आरोग्य उपकेंद्र स्थापन करण्यात मान्यता देण्यात आल्याबाबत**

**(३७) १६१३० (०९-०४-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये (सार्वजनिक आरोग्य विभाग) पाचोरा तालुक्यात (जि.जळगांव) खेडगांव (नदीचे) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व जारगांव, सारोळा व कोल्हे येथे आरोग्य उपकेंद्र स्थापन करण्यात मान्यता देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे अद्यापही स्थापन झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यांची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे केव्हा स्थापन होणार आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे,
(२) हे खरे आहे.
(३) प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्थापनेसाठी जागा उपलब्ध न झाल्यामुळे सदर संस्था कार्यान्वित झालेल्या नाहीत.
(४) जागा प्राप्त होताच बांधकाम हाती घेण्यात येईल.

---

**जिल्हा धुळे आरोग्य विभागाकडून आलेली कोट्यवधी रुपयांची औषधे ठेवण्यासाठी जिल्हा रुग्णालयाकडे प्रशस्त जागाच नसल्याबाबत**

**(३८) १६४८६ (१४-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यातील रुग्णालयाकडून मागणीनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालयांना औषधे पुरवठा केला जातो. आरोग्य विभागाकडून आलेली ही कोट्यवधी रुपयांची महागडी औषधे ठेवण्यासाठी जिल्हा रुग्णालयाकडे प्रशस्त जागाच नसल्याने ही औषधे जिन्यात, व्हरांडयात ठेवली आहेत, त्यामुळे औषधे खराब होण्यासह चोरीला जाण्याची भिती वाढली असल्याचे माहे मे २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने काही उपाययोजना केली आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशिल काय,
(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत जुन्या औषध भांडार इमारतीमध्ये औषधांचा साठा केला जातो. यामुळे औषधे खराब तसेच चोरी होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) आयपीएचएस योजनेंतर्गत मेडीकल स्टोअरचे नवीन बांधकाम करण्यात येत आहे. सदरील बांधकाम प्रगतीपथावर सुरु आहे.
(३) आयपीएचएस योजनेंतर्गत मेडीकल स्टोअरचे नविन बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता दिलेली असून माहे जानेवारी, २०१५ अखेर रु. १०६.०० लक्ष एवढा खर्च झालेला आहे. सदरील बांधकाम प्रगतीपथावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावनेर (जि. नागपूर) येथील पाटणसावंगी या ग्रामीण रुग्णालय अर्थसंकल्पात मंजूर करुन याबाबत निधीची तरतूद करण्याबाबत

**(३९) १७०४० (१७-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावनेर (जिल्हा नागपूर) येथील पाटणसावंगी या गावी ग्रामीण रुग्णालय सन २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पात मंजूर करुन याबाबत निधीची तरतूद करण्यात येऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सावनेर (जिल्हा नागपूर) येथील पाटणसावंगी या गावी ग्रामीण रुग्णालयासाठी माहे मार्च, २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सदर रुग्णालय बांधण्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली,
(३) असल्यास, सदर रुग्णालयाचे काम किती कालावधी पुर्ण करण्यात येणार आहे,
(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

बांधकामासाठी पुरेसा निधी उपलब्ध करण्यात आलेला नव्हता. केवळ लाक्षणिक तरतुद करण्यात आली होती.
(२) सन २०१५-१६ मध्ये रु. ०.०१ लक्ष इतकी तरतुद करण्यात आली आहे.

(३) पुरेसा निधी उपलब्ध होताच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर इमारतीचे काम विहित वेळेत पुर्ण करुन घेण्यात येईल.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील रिसोड येथील ग्रामीण रुग्णालय ५०/१०० खाटांचे करुन त्यास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देणेबाबत**

**(४०) १७२७३ (१७-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील ग्रामीण रुग्णालय रिसोडचा दर्जा उंचावून तेथे ५०/१०० खाटांचे रुग्णालय करुन त्याला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देणेबाबत माहे जुलै २०१० च्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय याबाबत शासनाची स्पष्ट भुमिका काय ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शासनाने निश्चित केलेल्या निकषात न बसल्याने बृहत आराखड्यात समावेश करण्यात आला नाही.

---

**गोरगरीबांसाठी राबविण्यात येणाऱ्या १०८ क्रमांकाच्या मोफत रुग्णवाहिका सेवेचे शासनाने खाजगीकरण केल्याबाबत**

**(४१) १७५८८ (१७-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य सरकारच्यावतीने गोरगरीबांसाठी राबविण्यात येणाऱ्या १०८ क्रमांकाच्या मोफत रुग्णवाहिका सेवेचे शासनाने खाजगीकरण केल्यामुळे त्याचा लाभ सर्वसामान्यांना मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णवाहिकांच्या सेवेचा लाभ सर्वसामान्यांना देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) ९३७ रुग्णवाहिकांच्या मोफत सेवेचा लाभ माहे फेब्रु, २०१४ पासून राज्यातील सर्व नागरिकांना देण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प चालू झाल्यापासून दिनांक ३०/११/२०१५ पर्यंत एकूण ५,५३,४२३ इतक्या रुग्णांना मोफत सेवा देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोणार तालुक्यातील (जि. बुलढाणा) सुलतानपूर व शिवणीपिसा येथील आरोग्य केंद्र बंद असल्याबाबत**

**(४२) १९७६७ (१४-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार तालुक्यातील (जिल्हा बुलढाणा) सुलतानपूर व शिवणीपिसा येथील आरोग्य केंद्रात रुग्णांना सुविधा मिळत नसल्याने ही आरोग्य केंद्र बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आरोग्य केंद्रामध्ये आवश्यक त्या आरोग्य सुविधा न पुरविण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर आरोग्य केंद्रामध्ये आवश्यक त्या आरोग्य सुविधा पुरविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर प्रा.आ.केंद्रामध्ये जनतेला आरोग्याच्या आवश्यक त्या सुविधा पुरविल्या जात आहेत.

(३) रुग्णांची तपासणी करुन औषधोपचार करण्यात येतो. कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात येतात. माताबाल संगोपन, कुष्ठरोग, क्षयरोग कार्यक्रम राबविण्यात येते. तसेच इतर सुविधा पुरविल्या जात आहे.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) येथे मंजुर असलेल्या ट्रामा केअर युनिटचे काम तातडीने सुरु करण्याबाबत**

**(४३) १९७९१ (१७-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) येथे मंजुर असलेल्या ट्रामा केअर युनिटला तात्काळ निधी देऊन ट्रामा केअर युनिटचे काम तातडीने सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने या ट्रामा केअर युनिटकरिता निधी उपलब्ध करुन दिला आहे काय,

(३) असल्यास, या युनिटचे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्याचे शासनास अपेक्षित आहे,

(४) अद्याप निधी उपलब्ध करुन दिला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हा रुग्णालयात अद्ययावत शवविच्छेदनगृहाचे काम**
**गेल्या चार महिन्यापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) २०००२ (१७-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा रुग्णालयात अद्यायावत शवविच्छेदनगृहाचे काम गेल्या चार महिन्यापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विलंब लागत असल्याने मृतदेहासह रुग्णालयांच्या नातलगांची हाल होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शवविच्छेदनगृहाचे काम प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शवविच्छेदनगृहाचे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

जुन्या शवविच्छेदनगृहाचे आधुनिकीकरण करीत असताना पर्यायी व्यवस्था म्हणून जवळच एका कक्षामध्ये शवविच्छेदनाची सोय उपलब्ध करुन देण्यात आली होती.

(३) शवविच्छेदनगृहाच्या आधुनिकीकरणाचे काम नुकतेच पुर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा परिषद येथील आरोग्य विभागात**
**औषधे ठेवण्यासाठी स्टोअर रुम नसल्याबाबत**

**(४५) २०७८४ (१७-०८-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात औषधे ठेवण्यासाठी स्टोअर रुम नसल्याने कोट्यवधीची औषधे वाया जाण्याची धक्कादायक माहिती दिनांक १० एप्रिल २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागा नसल्याने औषधे जुनी इमारती व इतर ठिकाणी ठेवल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला औषधे ठेवायला स्टोअर रुम मिळाला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सद्यपरिस्थितीमध्ये जिल्ह्यामधील जुने सिव्हील हॉस्पिटल येथे औषध भांडार कार्यरत आहे.

(२) हे खरे आहे.

जिल्हा परिषद आवारातील जुने जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय येथे औषध साठा सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) नवीन गोडाऊन उपलब्ध करुन दिले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील सिटी स्कॅन व एम.आर.आय. मशिन बंद असल्याबाबत**

**(४६) २४०८२ (१७-०८-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय येथील सिटी स्कॅन व एम.आर.आय. मशीन बरेच दिवसापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात उपचार घेणा-या गरीब रुग्णांना या सुविधा डॉ.पंजाबराव देशमुख हॉस्पीटल, अमरावती व्दारे पुरविण्याचा निर्णय स्थानिक प्रशासनाने घेतला असून त्यांची देयके जिल्हा सामान्य रुग्णालयातर्फे देण्याचा निर्णय ही घेतला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, डॉ.पंजाबराव देशमुख हॉस्पीटची सिटी स्कॅन व एम.आर.आय. ची देयके वितरीत न केल्याने या हॉस्पीटल तर्फे सुविधा पुरविण्याचे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सुविधा पुर्ववत सुरु करण्यासाठी शासन स्तरावर काय उपाययोजना करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

जिल्हा रुग्णालयाच्या नॉर्मप्रमाणे अमरावती जिल्हा रुग्णालयामध्ये एम.आर.आय.ही सुविधा उपलब्ध नाही. तसेच सी.टी.स्कॅन मशीन दिनांक १८/११/२०११ पासून बंद आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सी.टी.स्कॅन यंत्र खरेदीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालांदूर (ता.देवरी, जि.गोंदिया) जमीनदार येथील प्राथमिक आरोग्य केंद्राबाबत

**(४७) २४८७७ (१७-०८-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालांदूर (ता.देवरी, जि.गोंदिया) जमीनदार येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर झाले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मंजूर झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र जागा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजुर प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीसाठी जागा उपलब्ध होणार काय,

(४) असल्यास, केव्हा उपलब्ध होणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्रा.आ.केंद्राकरिता ग्राम पंचायत पालांदूर (जीम) यांनी जागा उपलब्ध करुन दिली आहे.

(३) जागा उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्हा रुग्णालयातील सोनोग्राफी सेंटर बंद असल्याबाबत

**(४८) २५०४८ (१७-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा रुग्णालयातील सोनोग्राफी सेंटर माहे एप्रिल, २०१५ च्या पहिल्या आठवड्यापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे तेथील रुग्णांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची अनेक पदे रिक्त असून याबाबतचा प्रस्तावही पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

एप्रिल, २०१५ च्या पहिल्या आठवड्यामध्ये सोनोग्राफी सेंटर बंद होते. परंतु दिनांक ८/४/२०१५ पासून ते आजपर्यंत नियमितपणे सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेठ (जि.नाशिक) ग्रामिण रुग्णालयातील एक्स रे मशिन बंद असल्याबाबत**

**(४९) २७२१० (१७-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ (जि.नाशिक) ग्रामिण रुग्णालयातील एक्स रे मशिनच बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी भागातील जनतेला यामुळे मोठा आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत असून मानसिक त्रासाला देखील सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा या आदिवासी भागातील रुग्णांची होणारी हेळसांड थांबविण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे. केवळ १-२ दिवसाकरिता वीज पुरवठ्यात दाब कमी जास्त झाल्यानंतर एक्स रे मशिन बंद होते. ते दुरुस्त करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम तात्काळ सुरु करण्याबाबत**

**(५०) २७७१० (१७-०८-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथील उत्तरवार शासकीय रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा असूनही इमारत इंग्रज काळातील असल्याने व अपुऱ्या कर्मचारी वर्गाच्या सेवेमुळे रुग्णाचे आतोनात हाल होत आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर रुग्णालयामध्ये तांत्रिक सुविधा व भौतिक सुविधा, बेडची संख्या, रुग्णांना वार्डची संख्या कमी असल्याने रुग्णाचे हाल होत आहे, हे खरे आहे काय,

(३) सदर उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम तांत्रिक सुविधेसह व कर्मचारी वसाहतीसह शासन अग्रक्रम देवून प्राधान्याने करणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

रुग्णांना आवश्यक ती वैद्यकीय सेवा पुरविली जात असल्यामुळे रुग्णांचे कोणतेही हाल होत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) होय.

उमरखेड जिल्हा यवतमाळ येथील ३० खाटांच्या रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.